# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

2015-16

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

### दि. ०१.०५.२०१५ ते ३१.०४.२०१६

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वय समितीची बैठक दि. २२.०७.२०१५ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठराव चर्चा करुन मंजूर करण्यात आले.

१) या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल आढावा घेण्यात आला.

३) गरीब विद्यार्थी निधी संकलन करण्याचे ठरले.

४) या वर्षाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

**उपक्रम :-**

**१. आव्हान - राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर :-**

दि. २५ मे ते १३ जून २०१५ दरम्यान SNDT महिला विद्यापीठ, पुणे येथे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते या शिबीरामध्ये महाविद्यालयातून दोन स्वंयसेविकांना पाठवण्यात आले. व त्यांनी शिबीरामध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

शिबीरातील सहभागी स्वयंसेविका

i) आरती तोडकर - B.A. I

ii) प्रगती शेळके - B.A. I यांनी सहभाग नोंदविला

**२. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची नांव नोंदणी व निवड प्रक्रिया :**

राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची नांव नोंदणी व निवड प्रक्रिया जून व जुलै महिण्यात करण्यात आली.

**३. छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती**

दि.२६ जून छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, डॉ.एस.डी.साळुंके, कार्यक्रम अधिकारी डॉ.महादेव गव्हाणे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

**४. आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना**

महाविद्यालयात रा.से.यो. विभागातर्फे दिनांक २१ जून रोजी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली.

दिनांक १८.०७.२०१५ रोजी पोलिसांना रमजान ईद निमित्त पोलीस मित्र म्हणुन ५० विद्यार्थ्यांनी पोलिस बंदोबस्तासाठी मदत केली.

**५. सल्लागार समितीची बैठक :**

दि. १० ऑगस्ट २०१५ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या दालनात प्राचार्याच्या आध्यक्षतेखाली सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली. सदरील बैठकीत वर्षभर राबवण्यात येणाऱ्या उपक्रमा संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

**६. स्वयंसेवकाची प्रकल्प विभागणी** :

दि. १२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना वर्षभरात प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विविध प्रकल्पांची विभागणी करून त्या प्रकल्पांचे वाटप करण्यात आले.

**७. आंतरराष्ट्रीय युवा दिन :**

आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिनांक १२.०८.२०१५ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. HIV चा लोगो महाविद्यालयाच्या प्रांगणात मानवी साखळीचा लोगो तयार केला.

**८. विद्यार्थी संसद प्रतिनिधीची निवड :**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेवर रा.से.यो. प्रतिनिधी म्हणून श्री.-शेल्लाळे खंडोबा व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु.प्रगती शेळके यांची निवड करण्यात आली. महाविद्यालयात रा.से.यो. विभागातर्फे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला

**९. "एकता दौड" आयोजन :**

दिनांक २१/०८/२०१५ रोजी ७.०० वा. "एकता दौड" च आयोजन केले होते. त्यामध्ये रा.से.यो. चे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

**१०. रा.से.यो. दिन :**

दि. २४.०९.२०१५ राजी रा.से.यो. दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले हाते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके सर, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून सोनवणे सर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.व्ही.जे.दळवी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी प्रतिनिधी शेल्हाळे खंडोबा यांनी करुन दिला.

**११. रक्षाबंधन कार्यक्रम :**

२९.०८.२०१५ रोजी रा.से.यो.च्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले हाते. या कार्यक्रमात प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व बहुसंख्येने स्वंयसेवक सहभागी होते.

**१२. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुंटुबियांना मदत निधी :**

दिनांक ०५.०९.२०१५ रोजी रा.से.यो.च्या स्वंयसेवकांनी दोन तासात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुंटुबीयांना ५३००० रु. निधी गोळा करुन संस्थेकडे सुपुर्द केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळूंके कार्यक्रमाधिकारी एम.एच.गव्हाणे सर, प्रा.दळवी सर व विद्यार्थी प्रतिनिधी शेलाळे खंडोबा व प्रगती शेळके, मुंडे राजीव देशपांडे प्रथमेश, योगिता बरकते माऊली बिरादार इ. विद्यार्थ्यांनी यासाठी मेहनत घेतली.

**१३. गणपती विसर्जन मिरवणूक सहभाग :**

लातूर जिल्हा पोलिस प्रशासनास गणपती विसर्जन मिरवणूकीसाठी सहकार्य करुन रा.से.यो.चे १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**१४. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रम :**

दि. १७.०९.२०१५ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.ढी.साळुंके उपस्थित होते.

**१५. सातारा व कपिधारा येथे नैसर्गिक सहलीचे आयोजन :**

दिनांक २५.०९.२०१५ रोजी रा.से.यो.तर्फे एकदिवशीय नैसर्गिक सहलीचे आयोजन केले होते. यामध्ये १५० विद्यार्थी उपस्थित होते.

**१६. स्वच्छ भारत अभियान :**

दिनांक ०१.१०.२०१५ रोजी महाविद्यालयात रा.से.यो. सर्व विद्यार्थ्यांना पूर्ण महाविद्यालय स्वच्छ करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर व वर्गखोल्यांची स्वच्छता केली यामध्ये रा.से.यो.चे सुमारे २०० स्वयंसेवक ,प्राचार्य व कार्यक्रमाधिकारी आदींची उपस्थिती होती.

**१७. महात्मागांधी जयंती :**

०२.१०.२०१५ रोजी महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस हार घालन्यात आला यावेळी रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकरी प्रा.डॉ.महादेव गव्हाणे सर तसेच प्रा.व्ही.जे. दळवी सर प्रा.तलवारे सर प्रा.पाटील सर ,प्रा.पाटील सर, प्रा.बनसोडे सर व विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्हाळे व प्रगती शेळके, बालगिर संतोष मुंडे राजीव, ज्योती सुर्यवंशी इ. उपस्थित होते.

**१८. पुर्व प्रजासत्ताक दिन संचलन निवड :**

दि.०८.१०.२०१५ ते १७.१०.२०१५ या कालावधीत नागपूर विद्यापीठ, नागपूर येथी आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन सोहळा निवड शिबीरामध्ये बालगीर संतोष या विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

**१९. विशेष युवक शिबीरासाठी गावाची निवडः**

दिनांक २८.१०.२०१५ रोजी वंजारवाडी या गावाचा प्रस्ताव आला होता. यासाठी हे गाव पाहण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. पी. एन. सगर, पर्यवेक्षक कल्याण कांबळे, प्रा. व्ही. जे. दळवी, प्रा. तलवारे सर, गवळी सर व विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्हाळे हे गेले होते.

**२०. जागतिक मानवी हक्क दिन :**

'जागतिक मानवी हक्क' दिनानिमित्त दि. १०.१२.२०१५ रोजी रा.से.यो. कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके व उपप्राचार्य प्रा.डॉ. महादेव गव्हाणे तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक गणेश केंद्रे व एन. पी. सोनवणे सर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्हाळे व प्रगति शेळके व प्रथमेश देशपांडे, अजय भोसले, राजीव मुंडे व ज्योती सुर्यवंशी इ. उपस्थित होते.

**२१. एड्स जनजागृती प्रभातफेरी :**

दि. ०१.१२.२०१५ रोजी एड्स जनजागृतीसाठी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. या मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ.महादेव गव्हाणे व इतर स्वयंसेवक उपस्थित होते.

**२२. विशेष युवक शिबीर :**

दि. २५ ते ३० डिसेंबर २०१५ रोजी वंजारवाडी येथे विशेष युवक शिबीर संपन्न झाले.

**२३. रेझींग डे सप्ताह :-**

दिनांक २ जानेवारी २०१६ रोजी रेझींग डे सप्ताहाचे आयोजन करण्यात आले यामध्ये रा.से.यो.च्या २०० विद्यार्थ्यांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदवला व तसेच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले विद्यार्थ्यांना ट्राफीलचे नियम सांगण्यात आले.

**२४. सावित्रीबाई फुले जयंती :**

दि. ३ जानेवारी या दिवशी महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागतर्फे सावित्रीबाई फुले जयंतीसाजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापिका श्रीमती अनुजा जाधव यांनी विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले यांच जीवनावर प्रकाश टाकणारे विचार सांगितले.यावेळी उपप्राचार्य - डॉ.महादेव गव्हाणे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी श्रीहरी तलवारे, डॉ. के. डी. सावंत, प्रा. विजय गवळी, डॉ. ए. ए. यादव व विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्हाळे व प्रगति शेळके इ. उपस्थित होते.

**२५. विवेकानंद व जिजाऊ जयंती :**

दिनांक १२.०१.२०१६ रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला यावेळी प्रतिमेचे पुजन प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य - डॉ.महादेव गव्हाणे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी श्रीहरी तलवारे, डॉ. के. डी. सावंत, प्रा. विजय गवळी, डॉ. ए. ए. यादव व विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्हाळे व प्रगति शेळके इ. उपस्थित होते.

**२६. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण :-**

दिनांक १९ ते २२ जाने २०१६ रोजी शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी रा.से.यो. च्या १०० विद्यार्थ्यांनी सतत तिन दिवस सर्वेक्षण केले.

या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांनी लातूर शहरातील विविध प्रभागामध्ये मागास भागात, झोपडपट्टयामध्ये, मार्केटमधी हॉटेल्स, दुकाने, बसस्थानके, इथून सुमारे ६७ शाळाबाह्य विद्यार्थ्यांची नोंद करून त्यांच्याविषयी माहिती जमा केली. सदरील सर्वेक्षणाचा अहवाल व सविस्तर माहिती महाआयुक्त कार्यालयामार्फत शासनाला पाठवण्यात आला.

**२७. प्रजासत्ताक दिन :-**

२६ जाने २०१६ रोजी रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी प्रजासत्ताक दिनानिमित्ताच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

**२८. प्रेरणा राज्यस्तरीय शिबीरात सहभाग :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा येथे आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयातील स्वयंसेवक श्री. गंगाधर वाडीकर याने विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व करून सहभाग नोंदवला.

**२९. युवती कार्यशाळेमध्ये सहभाग :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथे दि. २४ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान पार पडलेल्या विद्यापीठ स्तरीय युवती शाळेमध्ये महाविद्यालयातील दोन स्वयंसेविकांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेतील सहभागी स्वयंसेविका

१) कु.आरती तोडकर २) कु.संध्या कोल्हाळे

**३०. स्नेहसंमेलनाचे आयोजन :**

दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६ रोजी महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पाहुण्यांनी मार्गदर्शन केले तसेच वर्षभरात रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याबद्दल यावर्षी रा.से.यो. विभाग २०१५-१६ चा उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार खंडोबा शेल्हाळे व ज्योती सूर्यवंशी यांना देण्यात आला.

**३१. जंतनाशक गोळयाचे वाटप :-**

दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी जंतनाशक गोळयाचे वाटप केले या वेळी सर्व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

**३२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन :-**

दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले यावेळी व्याख्याने डॉ. शिंगाडे यांनी व्याख्यान केले.

**३३. ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन व कॅन्सर पोस्टर प्रदर्शन :-**

दिनांक १६ फेब्रु २०१६ रोजी महाविद्यालयाचत राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावेळी शाहू, फुले, आंबेडकर यांच्यावर आधारीत पुस्तकाचे प्रदर्शन प्रदर्शनामध्ये ३००० पुस्तकाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शासकिय वैद्यकीय महाविलयातील रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी कॅन्सरवर आधारीत पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

**३४. पल्स पोलिओ लसीकरण अभियान :-**

२१ फेब्रु २०१६ रोजी शासनातर्फे घेण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसीकरण अभियानामध्ये रा.से.यो. चे ५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. प्रत्यक्ष लसीकरणापूर्वी घरोघरी जाऊन जनतेमध्ये लसीकरणाबाबत जागरुकता निर्माण करणेण त्यासंबंधी सविस्तर माहिती देणे हे कार्य विद्यार्थ्यांनी पार पाडले. लाचबरोबर प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळी हजर राहून वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहकार्य केले.

**३५. अपघातग्रस्त विद्यार्थ्याला मदत :-**

राजर्षी शाहू महाविद्यालयाचा १२ वी एम.सी.व्ही.सी. चा मेलले आदिनाथ नावाच्या विद्यार्थ्यांचा रेल्वे अपघातामध्ये त्याचा उजवा पाय निकामी झाला त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्यामुळे त्याला महाविद्यायात रा.से.यो.विभागातर्फे २२ हजार रु. आर्थिक मदत केली.

**३६. शिवजयंती :-**

दिनांक १७ फेब्रु २०१५ रोजी शिव जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रा.डॉ. महादेव गव्हाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. शिव काळाची महती व महत्व त्यांनी स्पष्ट केले यावेळी सर्व कार्यक्रमाधिकारी स्वयंसेवक उपस्थित होते.

**३७. रुग्णास आर्थिक मदत :-**

दिनांक ३ मार्च २०१६ रोजी महाविद्यालयातील रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी बळीराम बनसोडे या व्यक्तीचे मुत्रपिंड निकामी झाल्यामुळे त्यांनी आर्थिक परिस्थिती हलाकीची होती त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ५५०० रु आर्थिक मदत केली.

**३८. जागतीक महिला दिन :-**

दिनांक ८ मार्च २०१६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयातील रा.से.यो.तर्फे सर्व विद्यार्थीनींना महिलांचा सन्मान करण्यालाही प्रचलित हुंडा व्यवस्थेला विरोध करण्यासाठी स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी महिलांवरील अत्याचार विरोधात आवाज उठविण्यासाठी शपथ देण्यात आली.

**३९. जलजागृती सप्ताह :-**

दिनांक १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान जलजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रांगोळी स्पर्धेचे आयोजन तसेच पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील रा.से.यो. विभागाचे समन्वयक डॉ. राजेश करपे यांचे 'जलसंवर्धनात युवकांची भुमिका' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**४०. राष्ट्रीय एकात्मता शिबीरात सहभाग :**

केली विद्यापीठ बेळगावं येथे आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.प्रगती शेळके हिने विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्त्व करून महाविद्यालयातर्फे शिबीरात सहभाग नोंदवला.

**४१. रक्तदान शिबीर :-**

दि. ३० मार्च २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती निमित्त रा.से.यो. विभागातर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले या शिबीरामध्ये रा.से.यो. स्वयंसेवकांनी ६० बाटल्या रक्तदान केले.

**४२. निरोप समारंभ :-**

दिनांक २ एप्रिल २०१६ रोजी रा.से.यो. विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला यावेळी सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांनी उपस्थिती नोंदवली.

**४३. महात्मा फुले जयंती :-**

दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विजयकुमार करजकर यांनी महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, प्रा. श्रीहरी तलवारे , प्रा. विजय गवळी सर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्लाळे, अजय भोसले इ.उपस्थित होते.

**४४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती :-**

दिनांक १४ एप्रिल २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात रा.से.यो. विभागातर्फे अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. महादेव गव्हाणे सर कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत प्रा. श्रीहरी तलवारे , प्रा. विजय गवळी सर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी खंडोबा शेल्लाळे, अजय भोसले इ उपस्थित होते.

**४५. समारोप :-**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये वरील उल्लेख केल्याप्रमाणे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, डॉ.महादेव गव्हाणे, प्रा.सौ.एम.एम. दुरुगकर, पर्यवेक्षक प्रा.कल्याण कांबळे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत , डॉ. पी.जी. कावळे , प्रा. श्रीहरी तलवारे , प्रा. विजय गवळी, प्रा. विजय दळवी, राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी शेल्हाळे खंडोबा ,शेळके प्रगती, भोसले अ अजय , बालबिर संतोष, मुंडे राजीव, देशपांडे प्रथमेश, ज्योती सूर्यवंशी , वाडीकर समाधान , गोपाळ जाधव , संध्या कोनाळे इ. आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष युवक शिबीर

## मौजे. वंजारवाडी, ता. रेणापूर, जि. लातूर

## 2015-16

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष युवक शिबिर अहवाल (2015-16)

## दि. 24 ते 30 फेब्रुवारी, 2016

## शिबिरासाठीचे गाव - मौजे रमजानपूर, ता.जि.लातूर

राष्ट्रीय सेवा योजनेचे ''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी'' विशेष युवक शिबिर मौजे वंजारवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर येथे दि. 24 ते 30 डिसेंबर 2015 या कालावधीत संपन्न झाले. या शिबीराचे उद्‌घाटन मा.श्री. रविदादा औसेकर,संचालक पनगेश्वर सहकारी साखर कारखाना, रेणापूर, यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील, अध्यक्ष, शिव छत्रपती शिक्षण संस्था हे अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमात श्रीमती राधा भारती , प्रा.पी.टी.पवार, जिल्हा समन्वयक, रा.से.यो. ,प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर,डॉ.एम.एच.गव्हाणे, समन्वयक प्रा.कल्याण कांबळे, श्री.सुर्यकांत मुंडे, सरपंच मौजे वंजारवाडी व श्री.शिवाजी मुंडे, श्री.बाळासाहेब मुंडे, इत्यादी यावेळी उपस्थित होते.

शिबीरामध्य 125 विद्यार्थी (97 मुले + 31 मुली ), 3 कार्यक्रम अधिकारी व 03 कर्मचारी उपस्थित होते. या शिबीर कालावधीमध्ये पुढील उपक्रम घेण्यात आले.

**1. श्रमदान/शोषखड्डे :**

स्वयंसेवकांनी गावामध्ये सुलभ शौचालयासाठी 22 शोषखड्डे खोदले.

**2. वृक्षारोपण :**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्राम पंचायत कार्यालय, घरासमोर या सार्वजनिक ठिकाणी खड्डे खोदुन वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर काही घरासमोर, मोकळ्या पटांगणात वृक्ष लावण्यात आले.

**3. ग्राम स्वच्छता :**

शिबीराच्या पहिल्या प्रारंभी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ केला. याखेरीज रोज गावातील इतर परिसर शिबीरार्थ्यांनी स्वच्छ केला.

**4. जनजागृती फेरी :**

शिबीर काळात 30 डिसेंबर, 2015 या समारोप दिवशी जनजागृती फेरी काढण्यात आली. पारंपारिक वेषभुषेमध्ये स्वयंसेवकांनी विविध घोषणांद्वारे ग्राम जागृती केली. या फेरीमध्ये शौचालयाचा वापर, ग्रामस्वच्छता, आरोग्य, अंध:श्रद्धा निर्मूलन, एड्स निर्मूलन, इत्यादी विषयाच्या घोषणा व घोषवाक्ये दिली. या दिंडीमध्ये ग्रामस्थदेखील सहभागी झाले होते.

**5. बौद्धिक कार्यक्रम :**

शिबीर काळात दररोज दुपारी 1.00 ते 4.00,3.30 ते 5.00 या वेळात बौद्धिक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या, लोककला, पर्यावरण समतोल, ग्रामीण विकासास यूवकांची व्यक्तीमत्त्व विकास या विषयावर अनुक्रमे डॉ.बी.बी. देशमुख, डॉ.उजळंबे , प्रा.आर.एन.केंद्रे, प्रा.विजय करजकर यांनी मार्गदर्शन केले.

**6. महिला मेळावा :**

शिबीराच्या तिसऱ्या दिवशी महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यास गावातील 30-100 महिला उपस्थित होत्या सौ.मंदाकीनी मुंडे, प्रा.एम.ए. शिंदे, प्रा.अहळे,प्रा.पी.जी.कावळे व जे.एम.जाधव यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. शौचालयाचा वापर महिला सुरक्षा याबाबत त्यांना उदबोधित करण्यात आले.

**7. अंधश्रध्दा निर्मुलपर कार्यक्रम :**

दि.25 डिसेंबर, 2015 रोजी प्रा.ओमप्रकाश मदनसुरे याचां कार्यक्रम आयोजित केला या कार्यक्रमात त्यांनी गावकऱ्यांना ग्रामस्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगीतले तसेच अंधश्रध्द् निर्मूलनासाठी प्रात्यक्षीकपर प्रबोधन केले.

**8. समाज प्रबोधनपर कार्यक्रम :**

समाज प्रबोधनपर दि.26.12.2015 रोजी ह.भ.प.समाधान वाडीकर महाराजांचे किर्तन आयोजीत केले या कार्यक्रमात गावकरी मंडळीनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व हा कार्यक्रम गावकऱ्यांमध्ये विशेष जागृती निर्माण करणारा ठरला.

**9. सांस्कृतिक कार्यक्रम :**

गावकरी व शिबीरार्थी यांच्या मनोरंजनासाठी संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. गायन, नृत्य, मूक अभिनय, काव्य, भारुड, पोवाडा इत्यादी कला प्रकारांच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता इत्यादी विषयांवर सामाजिक जागृती घडविणारे संदेश देण्यात आले. त्याबरोबरच श्री. भरत सातपूते व श्री. नरसिंग इंगळे, यांचे कवी संमेलन संपन्न झाले.

**10. समारोप :**

दि. 30 डिसेंबर, 2015 रोजी शिबीराचा समारोप करण्यात आला.डॉ.पी.आर.देशमुख, उपाध्यक्ष शिव छत्रपती शिक्षण संस्था, हे यावेळी उपस्थित होते. श्री.सुर्यकांत मुंडे कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके,प्रा.के.ए.कांबळे हे देखील यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.कल्याण सावंत यांनी केले. प्रा.एस.एम.तलवारे यांनी सूत्रसंचलन केले प्रा.विजय दळवी यांनी आभार मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ व शिबीरार्थी विद्यार्थी-विद्यार्थींनी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये विशेष शिबीरामध्ये वरिलप्रमाणे विविध कार्यक्रम घेण्यात आले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, डॉ.महादेव गव्हाणे, प्रा.एम.एम.दुरूगकर, समन्वयक प्रा.के.ए.कांबळे, कार्यक्रम अधिकारी डॉ.महादेव गव्हाणे, प्रा.के.डी.सावंत डॉ.पी.जी.कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.व्ही.जे.दळवी, प्रा.व्ही.जे.गवळी,विद्यार्थी प्रतिनिधी , खंडोबा शेलाळे इत्यादींनी सक्रिय सह

भाग नोंदविला.

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**